**विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या प्रवेश फेरीपुर्वी आवेदनपत्र भरण्यास, तसेच पुर्वी भरलेल्या आवेदनपत्रातील वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक:सीईटी-२०१७/प्र.क्र.१७६/मशि-२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१७.

वाचा:- (१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.रासाप्रपक/तिसरी फेरी/६०६/२०१७, दिनांक १.७.२०१७.

(२) शासन निर्णय क्रमांक:सीईटी-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२, दिनांक ७.४.२०१६.

(३) शासन अधिसूचना क्रमांक:बीएड-४६१६/प्र.क्र.१(भाग-२)/मशि-२, दिनांक ५.५.२०१७.

(४) शासन अधिसूचना क्रमांक:सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३/(भाग-२)/मशि-२, दिनांक ५.५.२०१७.

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम, २०१५ नुसार वरील संदर्भ क्र.३ व ४ येथील अधिसूचनांन्वये विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे सामायिक प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहेत. संदर्भ क्र.३ व ४ येथील अधिसूचनेतील नियम क्र.९ अन्वये विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची सीईटी दिलेल्या, परंतु अर्ज भरणे राहून गेलेल्या पात्र उमेदवारांना तिसऱ्या फेरीपुर्वी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास परवानगी देण्याचे, तसेच उमेदवारांनी भरलेल्या आवेदनपत्रातील वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिताच्या व्यावसायिक विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (CET) दिलेल्या, परंतु आवेदनपत्र भरु न शकलेल्या उमेदवारांना सामावून घेण्यासाठी आवेदनपत्र Online पध्दतीने भरण्यास परवानगी देण्याचा, तसेच उमेदवाराने पुर्वी भरलेल्या अर्जामध्ये जन्म तारीख, जात, लिंग, गुण, अल्पसंख्यांक उमेदवारी इत्यादि वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या प्रथम वर्षाच्या तिसऱ्या फेरीपुर्वी प्रवेशासाठी आवेदनपत्र Online पध्दतीने भरण्यासाठी व अर्जात बदल करण्यासाठीचे अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक लगेचच जाहीर करावे.

२.	अशाप्रकारे अर्ज केलेले उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीच्या प्रवेश निश्चितीनंतर रिक्त राहिलेल्या, तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेशासाठी पात्र राहतील.

३.	अशाप्रकारे प्रवेश अर्ज केलेल्या व पुर्वी सादर केलेल्या अर्जामध्ये वैयक्तिक बदल केलेल्या उमेदवारांची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल व या गुणवत्ता यादीनुसार तिसऱ्या फेरीतील व संस्थास्तरावरीय प्रवेश हे प्रवेश नियमातील तरतुदीनुसारच करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ह. व्यं. पऱ्हाते )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
३) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
६) प्राचार्य, शासकीय व सर्व अशासकीय अनुदानित विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
७) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
८) निवडनस्ती-मशि-२.